महावितरण

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

प्रिय ग्राहक,

**महावितरणच्या वर्धापन दिनानिमित्त आपल्याला हार्दिक शुभेच्छा!**

आपल्या सहकार्यामुळे महावितरण आज संपूर्ण महाराष्ट्रात विश्वासार्ह आणि सुरक्षित वीजपुरवठा करण्यास सक्षम ठरले आहे. या खास दिवशी, आपणास आणि आपल्या कुटुंबाला विद्युत सुरक्षेबाबत आवश्यक करावयाच्या व न करावयाच्या गोष्टी' (Do's and Don'ts) आठवण करून देणे आम्हाला गरजेचे वाटते:

### विद्युत सुरक्षा – हे करावे (Do's):

1. नेहमी परवानाधारक इलेक्ट्रिशियनकडूनच विजेचे काम करून घ्या.
2. वायरिंग, प्लग, सॉकेट आणि स्विच वेळोवेळी तपासून घ्या.
3. शॉर्ट सर्किट किंवा धक्का लागल्यास मुख्य स्विच त्वरित बंद करा.
4. लहान मुलांना विजेच्या सॉकेटपासून दूर ठेवा.
5. विद्युत उपकरणांना ग्राउंडिंग/अर्थिंग द्या.
6. आपत्कालीन स्थितीत 1912 या क्रमांकावर संपर्क साधा.
7. विद्युत अपघात टाळण्यासाठी आरसीसीबी वापरा.
8. आयएसआय मार्क असलेली विद्युत उपकरणे वापरा.
9. कूलरमध्ये पाणी ओतण्यापूर्वी विजपुरवठा बंद करा
10. शेतकऱ्यांनी कुंपण घालण्यासाठी सरकारने घोषित केलेल्या झटका मशीनचा वापर करा किंवा कायमस्वरूपी कुंपणासाठी बांबू आणि करवंद लागवडीला प्राधान्य द्या

### विद्युत सुरक्षा – हे करू नये (Don'ts):

1. कोणत्याही तुटलेल्या किंवा उघड्या वायरला हात लावू नका.
2. विजेच्या उपकरणावर पाणी सांडल्यास ते तत्काळ वापरू नका.
3. जास्त भार टाकणारी उपकरणे एकाच सॉकेटमध्ये लावू नका.
4. स्वतः वायरिंग किंवा दुरुस्ती करण्याचा प्रयत्न करू नका.
5. कोणतीही धातूची वस्तू सॉकेटमध्ये घालू नका.
6. ओले हात किंवा पायांनी विजेचे उपकरण वापरू नका

आपल्या सुरक्षिततेसाठी महावितरण नेहमी सज्ज आहे. आपणही आपली जबाबदारी ओळखून सुरक्षित वीज वापर सुनिश्चित कराल, ही अपेक्षा.

महावितरण
(महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लि.)